# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☎ ९६५६२३४ फॅक्स ९६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in


जा. क्र. : तंशिविकापु/आस्था/परवानगी/२०१९/ 1537 दिनांक : 04 APR 2019

प्रति,

प्राचार्य,
या कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित
पदवी व पदविका संस्था.

**विषय : या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना भेटण्यासाठी परवानगीबाबत...**

उपरोक्त विषयासंदर्भात असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याचशा संस्थांमधील / कार्यालयांमधील कर्मचारी संबंधित संस्था प्रमुखांची पूर्वपरवानगी न घेता परस्पर या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना भेटतात. अशा अचानक भेटीमुळे संबंधित अधिकारी / कर्मचा-यांच्या कामकाजाचा खोळंबा होतो व नाहक वेळ वाया जातो.

तरी याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, यापुढे आपल्या संस्थेतील ज्या कर्मचा-यांना त्यांच्या शासकीय कामकाजाविषयी या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयीन वेळेत भेटावयाचे आहे, अशा कर्मचा-यांना आपल्या स्वाक्षरीचे परवानगी पत्र असल्याशिवाय त्यांना या कार्यालयात पाठवू नये. अशी संबंधित संस्था प्रमुखांची पूर्व परवानगी पत्र नसलेले जे कर्मचारी या कार्यालयात येतील अशा कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल याची त्यांनी नोंद घेण्याबाबत त्यांना सूचित करावे.

तसेच ज्या कर्मचा-याकडे संबंधितांचे काम आहे, त्या कर्मचा-याकडे परस्पर न जाता संबंधित विभाग प्रमुखांकडे (कार्यालय अधिक्षक) / अधिका-यांकडे जाऊन कामाबाबत चौकशी करावी. तसेच या कार्यालयास प्रस्ताव / अर्ज इत्यादी सादर करताना त्या त्या विषयाबाबतचे शासन निर्णय / नियम / परिपत्रके इत्यादींचा संस्थास्तरावर अभ्यास करुन प्रस्तावाची पडताळणी करुनच प्रस्ताव या कार्यालयास सादर करावेत. केवळ मार्गदर्शनार्थ म्हणून सादर करु नयेत.

(डॉ. दि. रा. नंदनवार),
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.

(२) या कार्यालयातील सर्व कर्मचा-यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

*C:\Documents and Settings\admin1\My Documents\Misc.doc\7*